service

Add

२४

**महाराष्ट्र शासन**

क्र. नामनि २०१२/प्र.क्र.९४/२०१२/स्वासैक १.
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ५ डिसेंबर, २०१२

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
महाराष्ट्र राज्य

विषय :- **स्वातंत्र्यसैनिकाच्या विहित नातेसंबंधातील वारसदाराचे नामनिर्देशन करणेबाबत**

संदर्भ :- १. साप्रवि शासन परिपत्रक क्र.सीएनएस/१०८७/के.नं.१२/१६-अ, दि.४.३.१९९१
२. साप्रवि शासन निर्णय क्र.सीएनएस १०१०/१५०/प्र.क्र.६८/१०/१६-अ, दि.२९.५.२०१०

शासन परिपत्रक दिनांक ४.३.१९९१ अन्वये स्वातंत्र्यसैनिकांना त्यांच्या विहित नातेसंबधातील व्यक्तीस शासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट 'क' व 'ड' वर्ग सेवेतील नियुक्तीसाठी नामनिर्देशन करण्यास तसेच शासन निर्णय दिनांक २९.५.२०१० अन्वये स्वातंत्र्यसैनिकांच्या विधवा पत्नीसदेखील विहित नातेसंबंधातील व्यक्तीस नामनिर्देशित करण्याचे अथवा केलेले नामनिर्देशन बदलण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. श्री.सचिन हुंडेकरी, स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य, यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली रिट याचिका क्र.७९५५/२००६ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई, यांनी दि.२१.११.२०११ रोजी पुढीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे :-

"शासन पत्र क्र.इएसटी ३४९९/प्र.क्र.४८९/ई-७, दिनांक १४.११.१९९६ चे अवलोकन केले असता असे दिसते की, स्वातंत्र्य सैनिकाच्या विधवा पत्नी यांच्या जवळच्या किंवा विहित नातेसंबंधातील व्यक्तींना शासकीय सेवेत नोकरी मिळण्यासाठी नामनिर्देशित करण्याचा अधिकार देण्यामागील मूळ उददेश त्या पाल्यांनी विधवांचे पालनपोषण करणे असा आहे. जर स्वातंत्र्य सैनिकाची पत्नीच हयात नसेल तर त्यांचे पालनपोषण करण्याचा प्रश्न उदभवत नाही. सदर योजनेचा मूळ उददेश हा स्वातंत्र्य सैनिक अथवा त्यांची पत्नी यांचे त्यांच्या हयातीत पालनपोषण व्हावे असा असल्यामुळे त्यांच्या हयातीनंतर पालनपोषणाचा प्रश्न उदभवत नसल्याने त्यांनी केलेले नामनिर्देशन अस्तित्वात रहाणार नाही." न्यायनिर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने नामनिर्देशन प्रकरणांबाबत अनुपालन करणेबाबत उचित कार्यवाही करावी.

( भा.र.गावित )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत :- न्यायनिर्णयाची प्रत

प्रत,
अवर सचिव (कार्यासन १६-अ ),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
निवड नस्ती ( स्वासैक १ )

/Nomination-let.lwp/97